राज्यातील दूध उत्पादकांना दूध खरेदी दरात वाढ,शासकीय दूधाच्या विक्री दरात वाढ व दूध वितरकांच्या कमिशनमध्ये वाढ.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्रमांक-एमएलके-२०११/प्र.क्र. १९/पदुम-८
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- ४ फेब्रुवारी, २०११.

आमुक्त
७१२

प्रमाण(५प्रती)
(१५ प्रति)

वाचा :
१) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्रमांक-एमएलके-१०९९/ प्र.क्र. ३२१/ पदुम-८, दि. २७/१२/२०००
२) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्रमांक-एमएलके-१००५/१२८१/ प्र.क्र. १५/ पदुम-८, दि. १३/६/०६
३) शासन पूरक पत्र, कृषि व पदुम विभाग क्रमांक-एमएलके-१००५/१२८१/प्र.क१५/ पदुम-८, दि.११/९/०६
४) शासन निर्णय,कृषि व पदुम विभाग क्रमांक-एमएलके १०१०/प्र.क्र.४४/पदुम ८, दि.२९/३/२०१०
५) शासन शुध्दिपत्र क्र-एमएलके २०१०/प्र.क्र.१२१/पदुम ८, दिनांक ३१/३/२०१०
६) शासन निर्णय,कृषि व पदुम विभाग क्रमांक- एमएलके १०१०/प्र.क्र.४४/पदुम ८, दि. १४/७/२०१०
७) शासन निर्णय,कृषि व पदुम विभाग क्रमांक-एमएलके १०१०/प्र.क्र.४५०/पदुम ८, दि. २४/१२/२०१०

प्रस्तावना -

राज्यातील दूधाचे उत्पादन कमी होत असणे, पशुखाद्यांचे दर वाढत असणे, शेजारील राज्यातील दूधाचे दरापेक्षा राज्यातील दूधाचे खरेदी दर कमी असणे, खाजगी उत्पादकांनी राज्यातील दूध उत्पादकांचे खरेदी दर काही प्रमाणात वाढविणे, राज्यातील दूध उत्पादक शेतक-यांना त्यांच्या दूधास योग्य भाव मिळवून देण्यासाठी उपाययोजना करणे गरजेचे झालेले असणे या सर्व बाबी विचारात घेता, दूध खरेदीदरात वाढ करणे आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे शासनाचे वितरकांसाठी असलेले कमिशन सहकारी दुग्ध संघाकडून व महासंघाकडून देण्यात येणा-या कमिशनपेक्षा कमी असल्याचे दिसून येते. दूधाची विक्री वाढविल्यास शासनाच्या दुग्धशाळेतील हाताळणी तसेच कार्यक्षमतेत वाढ होऊन प्रति लिटर दुधावर होणारा खर्च कमी होईल. ही बाब विचारात घेऊन शासकीय दूध विक्री दर व कमिशन बाबत निर्णय घेणे आवश्यक झाले आहे. या सर्व बाबींचा विचार करुन दूध दर वाढीच्या अनुषंगाने निर्णय घेण्यासाठी म्हणून शासन निर्णय क्र. एमएलके-१००९/प्र.क्र.७१/पदुम ८, दिनांक १३/८/२००९ अन्वये गठीत करण्यात आलेल्या प्रदत्त समितीची दिनांक २५/१/२०११ रोजी व दिनांक ०३/०२/२०११ रोजी बैठक झाली. सदर बैठकीत झालेले निर्णय



आ ९५

विचारात घेऊन दूधाची दरवाढ करण्याची तसेच वितरकांच्या कमिशनमध्ये वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने शासन पुढील प्रमाणे आदेश देत आहे.

शासन निर्णय :

१. राज्यातील दुध उत्पादकांसाठी शासनाचे दूध खरेदी दराबाबत.

१) ३.५ % / ८.५% गुणप्रतीच्या गाय दूध खरेदीसाठी दूध उत्पादक शेतक-यांना प्रतिलिटर रु.१४.०० हा दर दिला जातो. तो रु. २.०० ने वाढवून रु.१६.०० एवढा करण्यात येत आहे.

२) ६.० % / ९.०% गुणप्रतीच्या म्हैस दूध खरेदीसाठी दूध उत्पादक शेतक-यांना प्रतिलिटर रु.२०.५० हा दर दिला जातो. तो रु. २.५० ने वाढवून रु.२३.०० एवढा करण्यात येत आहे.

३) गाय दूधाच्या उत्कृष्ठ गुणप्रतीसाठी सध्या प्रति पॉईंट प्रतिलिटर फॅटसाठी देय असलेल्या १५ पैसे ऐवजी प्रति पॉईंट प्रतिलिटर २० पैसे एवढा दर करण्यात येत आहे तर म्हैस दूधाच्या उत्कृष्ट गुणप्रतीसाठी सध्या असलेल्या प्रति पॉईंट प्रतिलिटर देय असलेल्या ३० पैसे या दरात बदल नाही.

४) राज्यातील सहकारी दूध संघाप्रमाणे राज्यातील बहुराज्यीय / एम.एम.पी.ओ.नोंदणीकृत प्रकल्पाचे दूध खरेदी करताना रु.२.४० प्रतिलिटर कमिशन देण्यात यावे.

५) स्निग्धेत्तर घनघटक ८.५% पेक्षा कमी असलेले स्निग्धेत्तर घनघटक ८.०% पर्यंतचे दूध स्विकारताना प्रति पॉईंट सरसकट १० पैसे कमी आकारुन स्विकारण्यात यावे.

गाय व म्हैस दूध खरेदी दराचा तक्ता

| गाय दूध | | म्हैस दूध | |
|---|---|---|---|
| गुणप्रत | खरेदी दर प्र.लि.(रु.) | गुणप्रत | खरेदी दर प्र.लि.(रु.) |
| ३.५ / ८.५ | १६.०० | ६.० / ९.० | २३.०० |
| ३.६ / ८.५ | १६.२० | ६.१ / ९.० | २३.३० |
| ३.७ / ८.५ | १६.४० | ६.२ / ९.० | २३.६० |
| ३.८ / ८.५ | १६.६० | ६.३ / ९.० | २३.९० |
| ३.९ / ८.५ | १६.८० | ६.४ / ९.० | २४.२० |
| ४.० / ८.५ | १७.०० | ६.५ / ९.० | २४.५० |
| ४.१ / ८.५ | १७.२० | ६.६ / ९.० | २४.८० |
| ४.२ / ८.५ | १७.४० | ६.७ / ९.० | २५.१० |
| ४.३ / ८.५ | १७.६० | ६.८ / ९.० | २५.४० |
| ४.४ / ८.५ | १७.८० | ६.९/ ९.० | २५.७० |
| ४.५ / ८.५ | १८.०० | ७.० / ९.० | २६.०० |
| ४.६ / ८.५ | १८.२० | ७.१ / ९.० | २६.३० |
| ४.७ / ८.५ | १८.४० | ७.२ / ९.० | २६.६० |
| ४.८ / ८.५ | १८.६० | ७.३ / ९.० | २६.९० |
| ४.९ / ८.५ | १८.८० | ७.४ / ९.० | २७.२० |
| ५.० / ८.५ | १९.०० | ७.५/ ९.० | २७.५० |

२. <u>शासकीय दूधाचे विक्री दराबाबत</u>

शासकीय दूध योजनांमार्फत विक्री होणा-या गाय दूध व टोण्ड दुधाच्या सध्याच्या विक्री दरात प्रति लिटर रु.२.५० या प्रमाणे वाढ करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे म्हैस दूध/ फुलक्रीम दुधाच्या विक्री दरात प्रतिलिटर रु.३/- ने वाढ करण्यात येत आहे. त्यानुसार शासकीय दूध योजनांमार्फत विक्री होणा-या पिशवीबंद दुधाचे विक्री दर पुढील प्रमाणे राहतील.

| अ. क्र. | योजना | दुधाचा प्रकार | सध्याचा विक्री दर प्र.लि. (रु.) | सुधारीत विक्री दर प्र.लि.(रु.) | सुधारीत विक्री दर अर्धा लिटरसाठी (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | बृ.मुं.दू.यो. | गाय दूध | २५.०० | २७.५० | १३.७५ |
| | ग्रामिण दूध योजना | गाय दूध | २४.०० | २६.५० | १३.२५ |
| २ | बृ.मुं.दू.यो. | म्हैस दूध | ३१.०० | ३४.०० | १७.०० |
| | ग्रामिण दूध योजना | म्हैस दूध | ३०.०० | ३३.०० | १६.५० |
| ३ | बृ.मुं.दू.यो. | फूल क्रिम दूध | ३१.०० | ३४.०० | १७.०० |
| | ग्रामिण दूध योजना | फूल क्रिम दूध | ३०.०० | ३३.०० | १६.५० |
| ४ | बृ.मुं.दू.यो. | टोण्ड दूध | २४.०० | २६.५० | १३.२५ |
| | ग्रामिण दूध योजना | टोण्ड दूध | २३.०० | २५.५० | १२.७५ |

३. <u>दुध वितरकांसाठी विक्री दराच्या प्रमाणात टप्पानिहाय कमिशन दर</u>

शासकीय दूध योजनेच्या दूध वितरणात वाढ होण्याच्या दृष्टीने दूध वितरकांनी जादा दुधाचे वितरण केल्यास त्यांना मिळत असलेले कमिशन हे त्यांनी केलेल्या दूध विक्रीच्या टप्प्यानुसार खालीलप्रमाणे देण्यांत यावे.

दूध वितरकांचे टप्पानिहाय कमिशन

| अ.क्र. | दूध विक्री परिमाण (लि.) | वितरक कमिशन प्रति लिटर (रु.) | वाहतूक खर्च प्र.लि.(रु.) | एकूण सुधारीत प्र.लि.कमिशन वाहतूक खर्चासह (रु.) (३+४) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | १० ते ५० | १.३० | ०.७० | २.०० |
| २ | ५१ ते १०० | १.५५ | ०.७० | २.२५ |
| ३ | १०१ ते २०० | १.८० | ०.७० | २.५० |
| ४ | २०१ ते ३०० | २.०५ | ०.७० | २.७५ |
| ५ | ३०१ चे वर | २.३० | ०.७० | ३.०० |

४. ठोक ग्राहकांना दुध वितरकांप्रमाणे कमिशन व वाहतूक दर

दूध वितरकांना देण्यात येत असणा-या कमिशनप्रमाणे खाजगी कंपन्या, कार्यालये तसेच हॉस्पीटल, कॅन्टीन, हॉटेल्स इत्यादी ठोक ग्राहकांसाठी कमिशन देण्यात यावे. ज्या ठोक ग्राहकांना स्थळपोच दूध देण्यात येईल. त्यांच्याकडून वाहतूक खर्च प्र.लि.रु.०.७० प्रमाणे व स्थळ पोहोच आकार प्र.लि.रु.०.५० इतका आकारण्यात यावा. तसेच ठोक ग्राहकांनी पिशवीबंद दूधाऐवजी सुटे दूधाची मागणी केल्यास पॉलिथिनफिल्मचा सरासरी खर्च रु.०.५० प्रतिलिटर या प्रमाणे कमी करण्यात यावा.

हे आदेश दिनांक १६ फेब्रुवारी २०११ पासून अंमलात येतील.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. ४२/११/व्यय-२, दि. ३/२/२०११ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(फि.जॉ.डिसोझा)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन,
कृषि, पशुसवंर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

प्रति,

आयुक्त दुग्धव्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, वरळी, मुंबई-४०० ०१८
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्या. गोरेगांव, मुंबई
महाव्यवस्थापक, बृहन्मुंबई दूध योजना, वरळी, मुंबई-४०० ०१८
प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, पुणे/ नागपूर/ मुंबई/ औरंगाबाद/ नाशिक/ अमरावती
सर्व जिल्हा दुग्धविकास अधिकारी
सर्व महाव्यवस्थापक/ व्यवस्थापक, शासकीय दूध योजना
महालेखापाल १/२, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परिक्षा), मुंबई/ नागपूर
अधिदान व लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा अधिकारी, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
वित्त विभाग (व्यय-२)
सर्व कार्यासने (पदुम विभाग)
निवड नस्ती

---------